पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - 18

अ प्रभाग समिती

सभावृत्तांत [ कार्यपत्रिका क्रमांक 5 ]

दिनांक : 10/10/2017 वेळ : सकाळी 11.00 वा.

---

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या अ प्रभाग समितीची माहे आक्टोबर 2017 ची मासिक सभा मंगळवार दिनांक 10/10/2017 रोजी सकाळी 11.00 वाजता अ क्षेत्रीय कार्यालयातील " राजमाता जिजाऊ सभागृह " येथे आयोजित करणेत आली होती. सदर सभेस खालील सन्मा. सदस्य/सदस्या उपस्थित होते.

| | | |
|---|---|---|
| 1. | मा. केशव हनुमंत घोळवे | सभापती |
| 2. | मा. अनुराधा गणपत गोरखे | सदस्या |
| 3. | मा. प्रमोद कुटे | सदस्य |
| 4. | मा. शैलजा अविनाश मोरे | सदस्या / उपमहापौर |
| 5. | मा. बाबर शर्मिला राजू | सदस्या |
| 6. | मा. अमित राजेंद्र गावडे | सदस्य |
| 7. | मा. जयश्री वसंत गावडे | सदस्या |

याशिवाय श्रीम. आशादेवी दुरगुडे – मा. क्षेत्रीय अधिकारी, श्री. सतिश इंगळे – मा. कार्यकारी अभियंता, स्थापत्य, श्री संजय खाबडे – मा. कार्यकारी अभियंता, विदयुत, श्रीम.रेखा गाडेकर – प्रशासन अधिकारी तथा सचिव (सभाशाखा), श्री संजय काशीद, श्री. सुभाष काळे, श्री. कोल्हे एल.पी., श्री अनिल शिंदे, ,श्री एम.आय. खोंद्रे, श्री. आर.एन. इंगळे – उपअभियंता, श्री. महादेव शिंदे – सहा. आरोग्याधिकारी, श्री ठुबे एस. व्ही. - कनिष्ठ अभियंता, श्री कुंभार पी.एल.- हॉर्टी.सुपरवायजर, वृक्षसंवर्धन, श्री. डी.जी.कांबळे – उदयान सहाय्यक इ. अधिकारी/कर्मचारी उपस्थित होते.

मा. सभापती, श्री. केशव हनुमंत घोळवे यांनी उपस्थित पदाधिकारी, सन्मा. नगरसदस्य, नगरसदस्या तसेच अधिकारी यांचे स्वागत केले. तदनंतर प्रशासन अधिकारी तथा सचिव सभाशाखा यांनी मागील दि. 12/9/2017 रोजीच्या सभावृत्तांतमधील ठराव क्रमांक 70 विषय क्रमांक 01 चे अनुषंगाने मा. दिवाणी व फौजदारी न्यायालय, आकुर्डी येथे कोर्टकेस दाखल झाली असून सदयस्थितीमध्ये सदरची बाब न्यायप्रविष्ट असल्याने सदर ठराव वगळून प्रस्तुतचा सभावृत्तांत कायम करण्यात यावा अशी मागणी मा. सभापती यांचेकडे केली. दि. 12/9/2017 रोजीचे सर्व विषयासह सभावृत्तांत कायम करीत असल्याचे मा. सभापती केशव हनुमंत घोळवे यांनी जाहीर केले व सभा सुरुवात करणेस अनुमती दिली.

दि. 10/10/2017 रोजीचे कार्यपत्रिकेवर एकही विषय नसल्याने खालील विषय ऐनवेळचे विषय म्हणून दाखल करुन घेण्यात आले.

विषय क्रमांक 1 :- सभापती, केशव हनुमंत घोळवे यांचा दि. 10/10/2017 चा प्रस्ताव
अ प्रभाग हद्दीमधील आरोग्य विभागातील कर्मचा-यांची सर्व कार्यालये सुस्थितीत व अद्यावत करणे.

विषय क्रमांक 2 :- सभापती, केशव हनुमंत घोळवे यांचा दि. 10/10/2017 चा प्रस्ताव
अ प्रभाग हद्दीमधील सर्व बस थांब्यांवर बस वेळापत्रकाचे फलक बसविणे. बस आली नाही तर किंवा ब्रेक डाऊन झाली तर संबंधित अधिका-याचे नाव व संपर्क नंबर्स नागरिकांच्या सोयीसाठी फलकावर लावणे.

विषय क्रमांक 3 :- सभापती, केशव हनुमंत घोळवे यांचा दि. 10/10/2017 चा प्रस्ताव
प्रभाग क्रमांक 10 मधील एच.डी.एफ.सी. कॉलनी ते शाहूनगर रस्त्यावरील पावसाच्या पाण्याचा निचरा होणेसाठीची व्यवस्था करणे.

विषय क्रमांक 4 :- सभापती, केशव हनुमंत घोळवे यांचा दि. 10/10/2017 चा प्रस्ताव
प्रभाग क्रमांक 10 मधील बर्ड व्हॅली समोरील व शेजारील जागेची स्वच्छता व निगा राहणेसाठी तसेच अ प्रभागामध्ये उत्पन्न मिळणेकामी पे अँड पार्कीग मंजुर करणे.

विषय क्रमांक 5 :- सभापती, केशव हनुमंत घोळवे यांचा दि. 10/10/2017 चा प्रस्ताव
अ प्रभाग हद्दीमधील सर्व वृक्षांची जनगणना करुन पट्टे मारुन नंबरींग करणे

विषय क्रमांक 6:- सभापती, केशव हनुमंत घोळवे यांचा दि. 10/10/2017 चा प्रस्ताव
अ प्रभाग कार्यालयामधील राजमाता जिजाऊ सभागृहामध्ये वातानुकूलीत यंत्रणा बसविणे.

विषय क्रमांक 7 :- सन्मा. सदस्या श्रीम. अनुराधा गणपत गोरखे यांचा दि.10/10/2017 रोजीचा प्रस्ताव
विदयानगर गोल्डनचौक येथे जो हॉल आहे त्यामध्ये संगणक क्लासेस एक वर्षासाठी सुरु होणार आहे तरी संरक्षणासाठी महापालिकेचा सिक्युरिटी गार्ड मिळणेकामी पत्र दिले असून सदर ठिकाणी सिक्युरिटी गार्ड नेमणेत यावा.

विषय क्रमांक 8 :- सन्मा. सदस्या श्रीम. अनुराधा गणपत गोरखे यांचा दि.10/10/2017 रोजीचा प्रस्ताव
शाहूनगर येथे शाहु संभाजी गार्डन भिंतीलगत विजेचा डीपी होता. तो आता बागेत बसविला आहे. पुर्वीच्या डीपीचा चौथरा तसाच रस्त्याच्या कडेला आहे. नागरीक तेथे कचरा टाकतात. तसेच अंधाराचा, आडोशाचा फायदा घेऊन लघुशंका करतात. सदरचा चौथरा मोठा असून तो त्वरीत हटवावा. व फुटपाथवर ब्लॉक बसवून घ्यावेत जेणेकरुन रस्त्यावर स्वच्छता राहील.

विषय क्रमांक 9 :- सन्मा. सदस्या श्रीम. अनुराधा गणपत गोरखे यांचा दि.10/10/2017 रोजीचा प्रस्ताव
संभाजीनगर [मॉडेल वॉर्ड] मध्ये कचरा उचलण्यासाठी जे मोठे ट्रक [कॉम्प्रेसर] आहेत. ते कच-याची समस्या सोडविण्यासाठी फार गरजेचे असल्याने शाहूनगरमध्ये सुध्दा सुरु करावेत. कारण ट्रकचे ठेकेदार ऐकत नाहीत ते म्हणतात फक्त संभाजीनगर करीताच ट्रक आहेत.

वरील प्रमाणे ऐनवेळचे विषय दाखल करुन घेण्यात आले.

ठराव क्रमांक 101 विषय क्रमांक 1

दिनांक 10/10/2017 विभाग : सन्मा. सदस्यांचा प्रस्ताव

सुचकः मा. अनुराधा गोरखे अनुमोदक : मा. शर्मिला बाबर

संदर्भ :- सभापती, केशव हनुमंत घोळवे यांचा दि. 10/10/2017 चा प्रस्ताव

अ प्रभाग हद्दीमधील आरोग्य विभागातील कर्मचा-यांची सर्व कार्यालये सुस्थितीमध्ये व अद्यावत करणेस मान्यता देण्यात येत आहे.

ठराव सर्वानुमते मंजुर झाला.

ठराव क्रमांक 102 विषय क्रमांक 2

दिनांक 10/10/2017 विभाग : सन्मा. सदस्यांचा प्रस्ताव

सुचकः मा. अनुराधा गोरखे अनुमोदक : मा. शर्मिला बाबर

संदर्भ :- सभापती, केशव हनुमंत घोळवे यांचा दि. 10/10/2017 चा प्रस्ताव

अ प्रभाग हद्दीमधील सर्व बस थांब्यांवर बस वेळापत्रकाचे फलक बसविणेस तसेच बस आली नाही तर किंवा ब्रेक डाऊन झाली तर संबंधित अधिका-याचे नाव व संपर्क नंबर्स नागरिकांच्या सोयीसाठी फलकावर लावणेस मान्यता देण्यात येत आहे.

ठराव सर्वानुमते मंजुर झाला.

ठराव क्रमांक 103 विषय क्रमांक 3

दिनांक 10/10/2017 विभाग : सन्मा. सदस्यांचा प्रस्ताव

सुचकः मा. अनुराधा गोरखे अनुमोदक : मा. शर्मिला बाबर

संदर्भ :- सभापती, केशव हनुमंत घोळवे यांचा दि. 10/10/2017 चा प्रस्ताव

प्रभाग क्रमांक 10 मधील एच.डी.एफ.सी. कॉलनी ते शाहूनगर रस्त्यावरील पावसाच्या पाण्याचा निचरा होणेसाठीची व्यवस्था करणेस मान्यता देण्यात येत आहे.

ठराव सर्वानुमते मंजुर झाला.

ठराव क्रमांक 104 विषय क्रमांक 4

दिनांक 10/10/2017 विभाग : सन्मा. सदस्यांचा प्रस्ताव

सुचकः मा. अनुराधा गोरखे अनुमोदक : मा. शर्मिला बाबर

संदर्भ :- सभापती, केशव हनुमंत घोळवे यांचा दि. 10/10/2017 चा प्रस्ताव

प्रभाग क्रमांक 10 मधील बर्ड व्हॅली समोरील व शेजारील जागेची स्वच्छता व निगा ठेवणेस तसेच अ प्रभागामध्ये उत्पन्न मिळणेकामी पे अँड पार्कींग मंजुर करणेस मान्यता देण्यात येत आहे.

ठराव सर्वानुमते मंजुर झाला.

ठराव क्रमांक 105 विषय क्रमांक 5

दिनांक 10/10/2017 विभाग : सन्मा. सदस्यांचा प्रस्ताव

सुचकः मा. अनुराधा गोरखे अनुमोदक : मा. शर्मिला बाबर

संदर्भ :- सभापती, केशव हनुमंत घोळवे यांचा दि. 10/10/2017 चा प्रस्ताव

अ प्रभाग हद्दीमधील सर्व वृक्षांची गणना करुन पट्टे मारुन नंबरींग करणेस मान्यता देण्यात येत आहे.

ठराव सर्वानुमते मंजुर झाला.

ठराव क्रमांक 106 विषय क्रमांक 6

दिनांक 10/10/2017 विभाग : सन्मा. सदस्यांचा प्रस्ताव

सुचक: मा. अनुराधा गोरखे अनुमोदक : मा. शर्मिला बाबर

संदर्भ :- सभापती, केशव हनुमंत घोळवे यांचा दि. 10/10/2017 चा प्रस्ताव

अ प्रभाग कार्यालयामधील राजमाता जिजाऊ सभागृहामध्ये वातानुकूलीत यंत्रणा बसविणेस मान्यता देण्यात येत आहे.

ठराव सर्वानुमते मंजुर झाला.

ठराव क्रमांक 107 विषय क्रमांक 7

दिनांक 10/10/2017 विभाग : सन्मा. सदस्यांचा प्रस्ताव

सुचक: मा. अनुराधा गोरखे अनुमोदक : मा. केशव घोळवे

संदर्भ :- सन्मा. सदस्या श्रीम. अनुराधा गणपत गोरखे यांचा दि. 10/10/2017 चा प्रस्ताव

विदयानगर गोल्डनचौक येथे जो हॉल आहे त्यामध्ये संगणक क्लासेस एक वर्षासाठी सुरु होणार आहे तरी संरक्षणासाठी महापालिकेचा सिक्युरिटी गार्ड मिळणेकामी पत्र दिले असून सदर ठिकाणी सिक्युरिटी गार्ड नेमणेस मान्यता देण्यात येत आहे.

ठराव सर्वानुमते मंजुर झाला.

ठराव क्रमांक 108 विषय क्रमांक 8

दिनांक 10/10/2017 विभाग : सन्मा. सदस्यांचा प्रस्ताव

सुचक: मा. अनुराधा गोरखे अनुमोदक : मा. केशव घोळवे

संदर्भ :- सन्मा. सदस्या श्रीम. अनुराधा गणपत गोरखे यांचा दि. 10/10/2017 चा प्रस्ताव

शाहूनगर येथे शाहु संभाजी गार्डन भिंतीलगत असलेला विजेचा डीपी आता बागेत बसविला आहे. पुर्वीच्या डीपीचा चौथरा तसाच रस्त्याच्या कडेला असल्याने नागरीक तेथे कचरा टाकतात. तसेच अंधाराचा, आडोशाचा फायदा घेऊन लघुशंका करतात. सदरचा चौथरा मोठा असल्याने तो त्वरीत हटविणेस तसेच रस्त्यावर स्वच्छता राहण्यासाठी फुटपाथवर ब्लॉक बसविणेस मान्यता देण्यात येत आहे.

ठराव सर्वानुमते मंजुर झाला.

ठराव क्रमांक 109 विषय क्रमांक 9

दिनांक 10/10/2017 विभाग : सन्मा. सदस्यांचा प्रस्ताव

सुचक: मा. अनुराधा गोरखे अनुमोदक : मा. केशव घोळवे

संदर्भ :- सन्मा. सदस्या श्रीम. अनुराधा गणपत गोरखे यांचा दि. 10/10/2017 चा प्रस्ताव

संभाजीनगर [मॉडेल वॉर्ड] मध्ये कचरा उचलण्यासाठी जे मोठे ट्रक [ कॉम्प्रेसर ] आहेत. ते ट्रक शाहूनगरमध्ये सुध्दा कच-याची समस्या सोडविण्यासाठी फार गरजेचे असल्याने [ ठेकेदारास समक्ष सांगून देखील ते ऐकत नसल्याने ] त्याठिकाणी सुरु करणेस मान्यता देण्यात येत आहे.

ठराव सर्वानुमते मंजुर झाला.

वरीलप्रमाणे सभेचे कामकाज झालेनंतर उपस्थित सन्मा. सदस्य यांनी त्यांचे वॉर्डामधील/प्रभागामधील अडी-अडींचणीबाबत खालीलप्रमाणे उपस्थित केलेल्या मुद्दयांचे अनुषंगाने मा. सभापती यांनी सुचना सर्व संबंधित अधिकारी यांना पुढील प्रमाणे सुचना/आदेश दिले.

- प्रस्तुत सभेमध्ये उपस्थित सन्मा. सदस्यांनी अ क्षेत्रीय कार्यालयाचे कार्यक्षेत्रांतर्गत ब-याच भागामध्ये अपुरा व अनियमित पाणीपुरवठा होत असल्याने नागरीक अत्यंत त्रस्त झाले असल्याचे सभागृहाचे निदर्शनास आणून दिले. तसेच पाणीपुरवठा विभागाचे कामकाजासंबंधी अत्यंत नाराजी व्यक्त केली. तसेच सन्मा. जयश्री गावडे व इतर सदस्यांनी वॉर्डामध्ये मोकाट कुत्र्यांचा व डुकरांचा सुळसुळाट झाला असल्याने त्यांचा बंदोबस्त करणेसंबंधी मुद्दा उपस्थित केला. तथापि, प्रस्तुत मिटींगमध्ये संबंधित अधिकारी उपस्थित नसल्याने मा. सभापती यांनी प्रभाग समितीच्या आजच्या सभेमध्ये पाणीपुरवठा विभागाचे कार्यकारी अभियंता व पशुवैदयकीय विभागाचे पशुवैदयकीय अधिकारी यांना यासंबंधी लेखी पत्र देऊन खुलासा मागविण्याच्या सुचना दिल्या. तसेच यापुढे अ क्षेत्रीय कार्यालयांतर्गत येणा-या चारही वॉर्डाचे संबंधित सर्व अधिकारी यांनी प्रभाग समितीच्या प्रत्येक मासिक/विशेष सभेमध्ये न चुकता हजर राहण्याच्या सुचना दिल्या. तथापि, उपअभियंता, पाणीपुरवठा यांनी पाणीपुरवठा अनियमित व अपुरा दाब यासंबंधीची माहिती सभागृहास दिली.
- सेकटर नंबर 23 मध्ये दि. 5/10/2017 रोजी पाणीपुरवठा विभागाचे काम सुरु होणार होते. तसा मेसेज देखील सन्मा. सदस्यांना विभागामार्फत आला असताना सदरचे कामकाज सुरु झाले नाही. ही अत्यंत खेदाची बाब असल्याने यांसबंधी संबंधित अधिकारीच जबाबदार असल्याचे सांगितले. पुढील आठवडयामध्ये दिपावलीचा सण असल्याने पाणीपुरवठा विभागाने पुढील चार दिवसांमध्ये पाणीपुरवठा वितरणासंबंधीचे नियोजन करुन सर्वच भागामध्ये नियमितपणे व प्रेशरने पाणीपुरवठा होईल याची खबरदारी घ्यावी.
- आरोग्य विभागामार्फत पुढील चार दिवसांमध्ये special drive घेऊन् चार ही वॉर्डामधील ज्या परिसरामध्ये जास्त प्रमाणात कचरा साचत आहे अशी ठिकाणे identify करुन् त्याप्रमाणे कचरा वाहतुकीचे नियोजन करावे. सहा. आरोग्याधिकारी, आरोग्य् यांनी पुढील चार दिवसांमध्ये पिंपरी कॅम्प् मेनबाजार परिसरामधील कचरा रात्रीचे वेळी उचलण्याची trial घेण्यात येणार आहे. सदरची trail योग्य् प्रकारे success झाल्यास त्याप्रमाणे कचरा उचलण्याचे नियोजन करणेत येणार असलेची माहिती सभागृहास दिली.
- सन्मा. सदस्या जयश्री गावडे यांनी रस्त्यावर राडारोड़ा टाकणा-यांना पाच हजार रुपये दंड करावा असे आरोग्य् विभागास सुचविले. तसेच सोसायटयांमध्ये कचरा ठेवण्यासाठी दिलेल्या दोन बकेटस अत्यंत छोटया असून त्याची quality देखील चांगली नसल्याचे सांगून मोठया बकेटस देणे आवश्यक असल्याचे सांगितले. तसेच चिंचवड स्टेशन ते चिंचवडगांव रस्त्यावर अत्यंत खड्डे झाले असून ते बुजवनू घ्यावेत. काही ठिकाणी वाचनालये तुटली आहेत ती दुरुस्ती करावीत, आरोग्यामार्फत् औषधफवारणी व धुरीकरण वेळेवर करणेत यावे, काही नागरीकांच्या घरासमोरील पेव्हींग ब्लॉक तुटले आहेत ते दुरुस्त करावेत, उदयान विभागाने वाढलेल्या झाडांच्या फांदया वेळेतच काढाव्यात अशी मागणी केली. सदयस्थितीमध्ये आरोग्याकडे असलेल्या गाडया बदलणे गरजेचे असल्याने मा. सभापती यांनी याबाबत पाठपुरावा करावा अशी मागणी केली.

- मा. सभापती यांनी वॉर्डामध्ये visit केल्यानंतर असे निदर्शनास येते की ठेकेदाराकडील हजर कर्मचा-यांपैकी सर्वच् कर्मचारी प्रत्यक्ष field वर कामकाज करताना दिसत नाहीत. अशा ठेकेदारांना आरोग्य् विभागामार्फत् नोटीसा बजाविण्यात याव्यात. तसेच ज्या भागामध्ये आरोग्यामार्फत धुरीकरण/फवारणी करणार आहे त्या भागातील सन्मा. सदस्यांना त्यासंबंधी एसएमएस करणेच्या सुचना दिल्या.
- सन्मा. सदस्य प्रमोद कुटे यांनी प्रभागांतर्गत पाणीपुरवठा, घनकचरा, मोकाट कुत्री/डुकरे, साफसफाई इ. बाबत वरीष्ठ पातळीवर मा. आयुक्त सो. यांचेसमवेत बैठक आयोजित करावी अशी मागणी केली.

वरील प्रमाणे सभेचे कामकाज होऊन मा. सभापती केशव हनुमंत घोळवे यांनी सर्व उपस्थित सन्मा. सदस्य, पदाधिकारी तसेच अधिकारी/कर्मचारी यांना दिपावली सणाच्या हार्दीक शुभेच्छा देऊन तसेच सर्वांचे आभार मानून सभा संपल्याचे जाहीर केले.

[ केशव हनुमंत घोळवे ]
सभापती
अ प्रभाग समिती
निगडी- 44

क्र. अक्षेका/11/कावि/1248/2017
दिनांक 31/10/2017
1/11

प्रशासन अधिकारी
तथा सचिव, सभा शाखा
अ प्रभाग समिती,
निगडी-44

प्रति,
सर्व संबंधित